नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - १२१ Issue - 121 | वार - शुक्रवार दि. २५ सप्टेंबर २०२६ Blow- Friday Date 25 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# शेतकऱ्यांना मदत दिवाळीपूर्वीच, दुष्काळाचा ‘जीआर’ आज काढणार; शेतातच मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा

## वाशीम जिल्ह्यातील दुष्काळी भागाची केली पाहणी ; शेतकऱ्यांना पीक विमा- कृषिमंत्री दत्तात्रय भरणे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अमरावती/वाशीम : पावसाअभावी खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. दुष्काळाची तीव्रता वाढलेल्या पश्चिम विदर्भातील शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य सरकारकडून तातडीच्या उपाययोजना केल्या जाणार आहेत. आज, शुक्रवारी दुष्काळ जाहीर करण्यासंदर्भातील शासन आदेश काढला जाईल. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत मिळेल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी येथे दिली.

वाशीम जिल्ह्यातील दुष्काळी भागाची पाहणी केली. यानंतर ते अमरावतीच्या बेलोरा विमानतळावरून मुंबईला रवाना झाले. तत्पूर्वी त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, वाशीममधील पाहणीदरम्यान पिकांची विदारक स्थिती आणि शेतकऱ्यांच्या अडचणी समोर लक्षात आल्या. दुष्काळाची निश्चिती करण्यासाठी असलेल्या संहितेनुसार ‘ट्रिगर-१’च्या आधारे पहिला शासन आदेश काढण्यात येणार आहे. त्यातून एखादा भाग वगळला गेला, तर पुढील टप्प्यात ‘ट्रिगर-३’च्या माध्यमातून त्या भागाचाही समावेश करण्याची कार्यवाही केली जाईल.

सध्या मोठ्या प्रमाणावर



दुष्काळाची स्थिती दिसत असलेल्या भागात तातडीने मदतीचा मार्ग मोकळा होणार आहे. दुष्काळ जाहीर झाल्यानंतर मदतीचा केंद्रबिंदू केवळ आर्थिक साहाय्यापुरता मर्यादित न ठेवता चारा आणि पाणीटंचाईवरही उपाययोजना करण्यात येणार आहेत. अन्नधान्याची टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी प्रशासनाला आवश्यक नियोजन करावे लागणार आहे. हेक्टरी थेट मदत शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाणार असून, ही मदत दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या पदरात पडेल, असे फडणवीस यांनी सांगितले.

वाशीम जिल्ह्याच्या मंगळूरपीर तालुक्यातील मोहगव्हाण येथील शेतकरी अनिल भगरे आणि अब्दुल नईम शेख रहीम यांच्या शेतातील नुकसानाची पाहणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी केली. यावेळी त्यांनी शेतकरीबांधवांशी संवाद साधला. त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. यानंतर मुख्यमंत्री म्हणाले, कमी पर्जन्यमानामुळे सोयाबीन, तूर तूर आदी पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांवर मोठे संकट आहे. तथापि, शेतकरीबांधवांनी खचून जाऊ नये. शासन शेतकऱ्यांसोबत आहे. त्यांना जास्तीत जास्त मदत करण्यात येईल.

‘दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी सरकार खंबीरपणे उभे असून, पीक विमा , कर्जमुक्ती; तसेच विविध सरकारी योजनांचा लाभ प्राधान्याने देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या संदर्भात पुढील दोन-तीन दिवसांत शेतकऱ्यांना मदत देण्यासंदर्भात अधिसूचना काढण्यात येईल,’ अशी ग्वाही कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. संगमनेर तालुक्यातील पिंपळे येथे शेतकरी सोपान चकोर यांच्या शेताच्या बांधावर जाऊन मंत्री भरणे यांनी नुकसानग्रस्त सोयाबीन पिकाची पाहणी केली. या वेळी त्यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधून पावसाचा खंड, पिकांची अवस्था आणि शेतीसमोरील अडचणी जाणून घेतल्या.

## झेडपी अध्यक्षांच्या स्वीय सहायकाने दीड लाखांची लाच घेतली; तीन दिवसांची पोलीस कोठडी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

रायगड : राज्यात गेल्या काही महिन्यात एसीबीने कारवाईचा धडाकाच लावला असून शिपायांपासून ते सनदी अधिकाऱ्यांपर्यंत अनेकांना लाच प्रकरणात अटक केली आहे. त्यामध्ये, अनेक बड्या अधिकाऱ्यांनाही बेड्या ठोकल्या असून जीएसटी अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्यात आली. त्यातच, जिल्हा परिषद अधिकाऱ्याच्या स्वीय सहायकास बुधवारी अटक करण्यात आली. रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडेकर यांचे स्वीय सहायक योगेश भस्मे यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

एका शिक्षकाच्या बदलीसाठी दीड लाख रुपयांची लाच घेताना एसीबीने त्यांना अटक केली होती. त्यानंतर, लाचखोर आरोपीस आज न्यायालयात हजर करण्यात आले.

रायगड जिल्हा परिषदेतील एका शिक्षकाच्या बदलीच्या कामासाठी दीड लाख रुपयांच्या लाचेची मागणी करणाऱ्या योगेश भस्मे यांना काल रायगड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडलं होतं. योगेश भस्मे हे रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांचे स्वीय सहाय्यक म्हणून काम पाहत होते. अँटी करप्शन ब्युरोकडे याबाबत यांच्याकडे रीतसर तक्रार करण्यात आली होती, त्यानंतर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचून भस्मे यांना लाच स्वीकारताना काल रंगेहात अटक केली होती. त्यानंतर आरोपी भस्मे यांना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर हे भाजपचे जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले होते. त्यानंतर योगेश भस्मे यांची वाकडीकर यांचे स्वीय सहाय्यक म्हणून निवड करण्यात आली होती. मात्र, काल लाच स्वीकारताना अटक करण्यात आल्यानंतर वाकडीकर यांचा देखील यामध्ये समावेश आहे का? याचा तपास संबंधित विभागाचे अधिकारी करत आहेत. मात्र, एसीबीच्या या कारवाई जिल्हा परिषद प्रशासकीय वर्तुळात आणि राजकीय क्षेत्रातही खळबळ उडाली आहे.

## महाराष्ट्रात पुन्हा पावसाचा जोर; मुंबईसह २१ जिल्ह्यांना अलर्ट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात पुन्हा एकदा पावसाने जोर धरला असून महाराष्ट्राच्या विविध भागांत पावसाच्या सरी सुरू आहेत. दरम्यान, हवामान विभागाने पावसाचा नवा अंदाज जारी केला असून मुंबई शहर आणि उपनगरांसह राज्यातील २१ जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे.

हवामान विभागाच्या अंदाजानुसार, मान्सूनने परतीची वाट धरली असली तरी अनेक भागांत पावसाची शक्यता कायम आहे. पूर्व घाटात वादळी पावसाचे वातावरण निर्माण झाले असून माथेरान-लोणावळा परिसरात मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मुंबईत सध्या ढगाळ वातावरण असून बदलापूर, अंबरनाथ, डोंबिवली, कल्याण आणि नवी मुंबई परिसरातही संध्याकाळपर्यंत वादळी पावसाची शक्यता आहे.



शुक्रवार, २५ सप्टेंबर रोजी राज्यातील २१ जिल्ह्यांना पावसाचा अलर्ट देण्यात आला आहे. यामध्ये भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, जळगाव, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती, बुलढाणा, गडचिरोली, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ या जिल्ह्यांचा समावेश आहे.

त्यामुळे नागरिकांनी स्थानिक हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन आवश्यक ती काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## २ ऑक्टोबरला देशभरात युपीआय बंद, गांधी जयंतीला व्यापाऱ्यांचा ‘नो यूपीआय डे’

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




नवी दिल्ली : डिजिटल इंडियाच्या युगात गुगल पे, फोन पे आणि पेटीएम सारख्या यूपीआय ॲप्सचा वापर करणाऱ्या नागरिकांसाठी एक अत्यंत महत्त्वाची आणि मोठी बातमी समोर आली आहे. केंद्र सरकारने यूपीआय व्यवहारांवर लागू केलेल्या नव्या शुल्काविरोधात देशभरातील व्यापाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. १५ ऑक्टोबर २०२६ पासून लागू होणाऱ्या नव्या मर्चंट डिस्काउंट रेटच्या निषेधार्थ व्यापारी संघटनांनी थेट राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीच्या दिवशी, म्हणजेच २ ऑक्टोबर रोजी 'नो यूपीआय डे' पाळण्याचे मोठे आवाहन केले आहे.

'फेडरेशन ऑफ ऑल इंडिया व्यापार मंडळ' आणि 'कॉन्फेडरेशन ऑफ ऑल इंडिया ट्रेडर्स' यांसारख्या देशातील आघाडीच्या व्यापारी संघटनांनी हा मोठा निर्णय घेतला आहे. त्यानुसार, २ ऑक्टोबर रोजी देशभरातील छोटे-मोठे व्यावसायिक, किरकोळ दुकानदार आणि पेट्रोल पंप चालक यूपीआयद्वारे डिजिटल पेमेंट स्वीकारणार नाहीत. त्यामुळे त्या दिवशी ग्राहकांना खरेदीसाठी रोख रक्कम किंवा क्रेडिट, डेबिट कार्डचा वापर करावा लागणार आहे.

एमडीआर ही एक प्रकारची प्रोसेसिंग फी असते, जी डिजिटल पेमेंटची सुविधा देणाऱ्या बँका आणि पेमेंट गेटवेद्वारे व्यापाऱ्यांकडून वसूल केली जाते. सरकार आणि एनपीसीआयच्या नव्या निर्णयानुसार, १५ ऑक्टोबर २०२६ पासून २००० रुपयांपेक्षा जास्त रकमेच्या यूपीआय व्यवहारांवर ०.४ % एमडीआर शुल्क आकारले जाणार आहे.

हे शुल्क कमाल ३०० रुपयांपर्यंत सीमित ठेवण्यात आले आहे. म्हणजेच व्यवहार १ लाख रुपयांचा असो वा १० लाख रुपयांचा, व्यापाऱ्याला जास्तीत जास्त ३०० रुपये शुल्क भरावे लागेल.

किराणा, पेट्रोल-डिझेल, इलेक्ट्रॉनिक्स आणि धान्यांसारख्या व्यवसायांमध्ये आधीच नफ्याचे प्रमाण अत्यंत कमी असते. त्यात आता अतिरिक्त ०.४०% शुल्क भरावे लागल्यास मोठा आर्थिक फटका बसणार असल्याचे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

मध्य प्रदेश, महाराष्ट्रातूनही जोरदार पाठिंबा

या निर्णयाविरोधात २३ सप्टेंबर रोजी मध्य प्रदेशातील भोपाळ, इंदूर, ग्वाल्हेर आणि मुझफ्फरपूर यांसारख्या शहरांमधील तब्बल १२५ व्यापारी संघटनांनी प्रातिनिधिक स्वरूपात 'नो यूपीआय डे' पाळला, ज्यामुळे तेथील २५ % व्यवहार प्रभावित झाले. इंदूर रिटेल गार्मेंट्स असोसिएशनने तर १५ ऑक्टोबरपूर्वी हा निर्णय मागे न घेतल्यास सर्व यूपीआय क्यूआर कोड मशीन्स पाण्यात फेकून देऊ, असा इशाराच दिला आहे.

### शनिवारी अंक नाही

आज शुक्रवार, २५ सप्टेंबर रोजी अनंत चतुर्दशी निमित्त दैनिक यश सिद्धी न्यूज कार्यालयास सुटी आहे. त्यामुळे उद्या शनिवार २६ सप्टेंबर २०२६ रोजीचा अंक प्रसिद्ध होणार नाही. याची वाचक, जाहिरातदार व विक्रेत्यांनी नोंद घ्यावी.

– संपादक

देशात ‘वोट चोरी’ झाल्याचा सर्वात मोठा पुरावा

निवडणूक आयोगावर चढवला घणाघाती हल्ला

# निवडणूक आयोगाची विश्वासार्हता धोक्यात? मुख्य निवडणूक आयुक्तांवर महाभियोग आणण्याची विरोधकांची तयारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : केंद्रीय निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवरून आणि पारदर्शकतेवरून मोठे राजकीय वादळ उठले आहे. निवडणूक आयोगातील अंतर्गत मतभेदाची बातमी समोर आल्यानंतर, २४ सप्टेंबर रोजी लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एक धडाकेबाज पत्रकार परिषद घेऊन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि मोदी सरकारवर अत्यंत गंभीर आरोप केले. राहुल गांधी यांनी थेट निवडणूक आयोगावर लोकशाहीचा विनाश करणारा आणि देशद्रोह करणारा असा घणाघाती हल्ला चढवला आहे.

राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत पीपीटी सादर करत भाजपच्या विजय आणि निवडणूक आयोगाच्या कारभारावर अनेक प्रश्न उपस्थित केले. भारतीय राजकारणात सत्ताविरोधी लाट ही एक मोठी वस्तुस्थिती आहे. मग भाजपविरोधात जनता नाराज असतानाही प्रत्येक निवडणुकीत भाजपच कसा जिंकतो? असा सवाल राहुल गांधी यांनी केला.

निवडणूक आयोगातील इतर दोन आयुक्तांनी ज्ञानेश कुमार यांच्या निर्णयांवर १४ वेळा तीव्र आक्षेप नोंदवले आहेत. हाच देशात 'वोट चोरी' झाल्याचा सर्वात मोठा पुरावा आहे, असा दावा राहुल गांधी यांनी केला.

ज्ञानेश कुमार हे पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्या सांगण्यावरून काम करत आहेत. त्यांनी





संविधानावर आणि देशावर हल्ला केला आहे. त्यामुळे त्यांनी तातडीने आपल्या पदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी राहुल गांधी यांनी केली.

काँग्रेस आणि 'इंडिया' आघाडीच्या इतर मित्रपक्षांनी आता मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात संसदेत महाभियोग प्रस्ताव आणण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे.

कायदेतज्ज्ञांच्या मदतीने महाभियोगाच्या मसुद्याची तयारी सुरू आहे. आगामी १ ते २ आठवड्यांत लोकसभा आणि राज्यसभा दोन्ही सदनांमध्ये ही नोटीस सादर केली जाण्याची शक्यता आहे.

महाभियोग प्रस्ताव आणण्यासाठी लोकसभेत किमान १०० खासदार आणि राज्यसभेत ५० खासदारांच्या सह्यांची आवश्यकता असते. नोटीस स्वीकारल्यानंतर चौकशी समिती गठीत केली जाते आणि त्यानंतर दोन्ही सदनांमध्ये २/३ बहुमताने प्रस्ताव मंजूर व्हावा लागतो.

निवडणुकांवर प्रश्नचिन्ह

राहुल गांधी यांनी आरोप केला की, ज्ञानेश कुमार मुख्य निवडणूक आयुक्त झाल्यानंतर देशात झालेल्या सर्व निवडणुकांमध्ये हेराफेरी झाली आहे.

नोव्हेंबर २०२५ – बिहार विधानसभा निवडणूक: भाजप आघाडीचा विजय.

एप्रिल २०२६ – आसाम विधानसभा निवडणूक: भाजप आघाडी पुन्हा सत्तेत.

एप्रिल २०२६ – केरळ आणि पुदुचेरी निवडणूक: पुदुचेरीमध्ये एनडीएचा विजय.

एप्रिल २०२६ – तमिळनाडू विधानसभा निवडणूक: टीव्हीकेचा (ढतघ) विजय.

मे २०२६ – पश्चिम बंगाल विधानसभा निवडणूक: भाजपने पहिल्यांदाच विजय मिळवून सरकार स्थापन केले.

### राहुल गांधींचा आरोप चुकीचे, भाजपकडून जोरदार पलटवार

**राहुल गांधींच्या या आरोपांनंतर भारतीय जनता पक्षानेही पलटवार केला आहे. भाजपचे प्रवक्ते आणि राज्यसभा खासदार सुधांशु त्रिवेदी यांनी राहुल गांधींचे सर्व आरोप फेटाळून लावले. ते म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी असणारा मत्सर आणि निवडणुकांमधील सातत्याने होणारा पराभव यांमुळे राहुल गांधी निवडणूक आयोगातील सामान्य प्रशासकीय मतभेदांना उगीचच मोठे करून सांगत आहेत. निवडणूक आयोगातील सर्व निर्णय हे सर्वसंमतीनेच घेतले गेले आहेत.**

## संपादकीय....

### महाभियोग प्रस्ताव

काँग्रेस आणि 'इंडिया' आघाडीच्या इतर मित्रपक्षांनी आता मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात संसदेत महाभियोग प्रस्ताव आणण्याची जोरदार तयारी सुरू केली आहे. कायदेतज्ज्ञांच्या मदतीने महाभियोगाच्या मसुद्याची तयारी सुरू आहे. आगामी १ ते २ आठवड्यांत लोकसभा आणि राज्यसभा दोन्ही सदनांमध्ये ही नोटीस सादर केली जाण्याची शक्यता आहे. महाभियोग प्रस्ताव आणण्यासाठी लोकसभेत किमान १०० खासदार आणि राज्यसभेत ५० खासदारांच्या सह्यांची आवश्यकता असते. नोटीस स्वीकारल्यानंतर चौकशी समिती गठीत केली जाते आणि त्यानंतर दोन्ही सदनांमध्ये २/३ बहुमताने प्रस्ताव मंजूर व्हावा लागतो. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या स्वायत्ततेवरून आणि पारदर्शकतेवरून मोठे राजकीय वादळ उठले आहे. निवडणूक आयोगातील अंतर्गत मतभेदाची बातमी समोर आल्यानंतर, २४ सप्टेंबर रोजी लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी एक धडाकेबाज पत्रकार परिषद घेऊन मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि मोदी सरकारवर अत्यंत गंभीर आरोप केले. राहुल गांधी यांनी थेट निवडणूक आयोगावर लोकशाहीचा विनाश करणारा आणि देशद्रोह करणारा असा घणाघाती हल्ला चढवला आहे. राहुल गांधी यांनी पत्रकार परिषदेत पीपीटी सादर करत भाजपच्या विजय आणि निवडणूक आयोगाच्या कारभारावर अनेक प्रश्न उपस्थित केले. भारतीय राजकारणात सत्ताविरोधी लाट ही एक मोठी वस्तुस्थिती आहे. मग भाजपविरोधात जनता नाराज असतानाही प्रत्येक निवडणुकीत भाजपच कसा जिंकतो? असा सवाल राहुल गांधी यांनी केला. निवडणूक आयोगातील इतर दोन आयुक्तांनी ज्ञानेश कुमार यांच्या निर्णयांवर १४ वेळा तीव्र आक्षेप नोंदवले आहेत.

# कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास देश पातळीवरील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखानापुरस्कार प्रदान

## भालेवाडी, बोरामणी, नान्नज, चिंचणी व लोंढेवाडी येथे विविध पर्यटन अनुभवांची पर्वणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्यास नॅशनल फेडरेशन को–ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरी लिमिटेड नवी दिल्ली यांचा गळीत हंगाम २०२५/२०२६ मध्ये कारखान्याने केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल उच्च साखर उतारा विभागातील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखानाहा पुरस्कार केंद्रीय रस्ते विकास मंत्री मा .नामदार श्री नितीनजी गडकरी, केंद्रीय कृषिमंत्री मा.ना. शिवराज सिंग चव्हाण, केंद्रीय सहकार व नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मा.ना. श्री मुरलीधर मोहोळ, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मा.ना. कृष्णपाल गुर्जर, व महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री मा.ना. बाबासो पाटील, पंजाबचे कृषिमंत्री मा.ना. श्री गुरमीत सिंह हरियाणाचे सहकार मंत्री व छत्तीसगडचे सहकार मंत्री यांच्या शुभहस्ते नवी दिल्ली



येथे प्रधान करण्यात आला सदर पुरस्कार कारखान्याचे चेअरमन मा.आ. प्रशांतराव परिचारक (मालक) व व्हाईस चेअरमन सर्व सभासद संचालक, कार्यकारी संचालक डॉक्टर यशवंत कुलकर्णी अधिकारी व कामगार यांच्या अभिनंदन केले.

कारखान्यात पुरस्कार मिळवण्याची परंपरा अखंडीत असून प्रत्येक वर्षी कारखान्यास नवनवीन पुरस्कार मिळत आहेत कारखाना प्रत्येक क्षेत्रात सर्वश्रेष्ठ काम करत असून कारखान्याच्या प्रगतीचा आलेख चढता ठेवलेला आहे व कारखाना तसेच आगामी काळात ही वेगवेगळी विक्रमी प्रस्थापित करेल.

यावेळी कार्यकारी संचालक डॉक्टर यशवंत कुलकर्णी यांनी माहिती दिली की सहकार उद्योगांमध्ये नॅशनल फेडरेशन को–ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरी लिमिटेड नवी दिल्ली ही संस्था साखर कारखानदारी मध्ये प्रत्येक वर्षी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या साखर उद्योगातील सवतांना पुरस्कार देऊन गौरविण्यात असते. पुरस्कारासाठी निवड करीत असताना कारखान्याच्या प्रत्येक विभागातील कामकाजाचा आढावा घेऊन सर्वोच्च कार्य करणाऱ्या संस्थेत पुरस्कार दिला जातो व आपल्या कारखान्याने मागील काही वर्षापासून अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले आहे त्यामध्ये प्रामुख्याने सौर ऊर्जा निर्मिती प्लांट, सभासद विमा योजना शेतकरी प्रशिक्षण मानव विहिरहित वजन काटा, रेन हार्वेस्टिंग, वृक्ष लागवड, फळ रोपे लागवड, सीसीटीव्ही चा वापर, मल्टी एंट्री रेटेड कॉर्पोरेशन प्लांट, कंडित सिंग पॉलिशिंग युनिट, ऑनलाइन मॉनिटरिंग सिस्टीम, ऊस विकासाच्या योजना विविध योजना विकास कामासाठी अनेक सुविधा सुरू केलेले आहेत.

त्याचप्रमाणे कारखान्याच्या रसायन व उत्पादन विभागांमध्ये अथवा दोन्हीकरण केले असून गाळात क्षम तेच्या पुरेपूर वापर वाया जाणाऱ्या साखरेचे प्रमाण नगण्य, मिल हाऊस बोईलींग हाऊस च्या कार्यक्षमतेत वाढ, सीजन मध्ये प्रत्येक तांत्रिक बाबींमुळे कारखाना बंद राहण्याचे प्रमाण खूपच कमी, साखरेचा दर्जा यामध्ये सर्वोच्च काम केले असून ऊस तोडणी नंतर गाळप होईपर्यंत लागणारा कालावधी अत्यंत कमी करून ताज्या उसाचे गळप करण्यावर भर दिला आहे.

या सर्व बाबींचा विचार करून कारखान्यात देशातील सर्वोत्कृष्ट सहकारी साखर कारखाना हा पुरस्कार मिळाला असून पुरस्कार प्रदान कार्यक्रम आज नवी दिल्ली येथे संपन्न झाला आहे.

# महाराष्ट्रात स्थापन एक क्रांतिकारक पंथ : सत्यशोधक समाज

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
**(२४–३० सप्टेंबर: सत्यशोधक समाज स्थापना दिन.)**

सत्यशोधक समाज– सत्यशोधकांचा समाज ही ज्योतिबा फुले यांनी दि.२४ सप्टेंबर १८७३ रोजी महाराष्ट्रातील पुणे येथे स्थापन केलेली एक सामाजिक सुधारणा संस्था होती. या समाजाने दलित आणि महिलांचे दुःख वा वेदना कमी करण्यासाठी प्रयत्न केले. या समाजाने महाराष्ट्रातील वंचित गटांसाठी, विशेषतः महिला, शेतकरी आणि दलितांसाठी शिक्षण, सामाजिक हक्क आणि राजकीय संधी वाढवण्याचे ध्येय ठेवले होते. ज्योतिराव यांच्या पत्नी सावित्रीबाई या संस्थेच्या महिला विभागाच्या प्रमुख होत्या. सन १९३० च्या दशकात अनेक नेते भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षात सामील झाल्यामुळे हा समाज विसर्जित झाला. श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरुजींचा सदर माहितीपूर्ण संकलित लेख आपणास समर्पित जी... संपादक.

सामाजिक समता व समताप्रधान समाजनिर्मितीसाठी महाराष्ट्रात स्थापन झालेला एक कांतिकारक पंथ. समाजाच्या आमूलाग्र मौलिक परिवर्तनाकरिता हिंदू समाजरचनेतील माणसांना उच्चनीच मानणारा जातिभेद, कर्मकांड, मूर्तिपूजा, स्त्रीदास्य, अंधश्रद्धा यांचे निर्मूलन करून वैचारिक क्रांती घडविण्याकरिता महात्मा जोतीराव फुले यांनी समाजातील काही समविचारी मंडळींच्या सहकार्याने २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुण्यात सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्याच्या निर्मितीमागील पार्श्वभूमी, तात्त्विक बैठक, कार्य व उपक्रम यांसंबंधी माहिती म. फुले व त्यांच्या अनुयायांनी लिहिलेल्या प्रासंगिक निबंध व छोटेखानी पुस्तिकेतून (सार्वजनिक सत्यधर्म) मिळते.

भूमी : एकोणिसाव्या शतकाच्या मध्यास पाश्चात्त्य सुधारणेचे स्वागत करणाऱ्या प्रवृत्तीचे तीन प्रवाह महाराष्ट्रात स्वतंत्र रीत्या प्रभावीपणे वाहताना दिसतात. पहिला प्रवाह, धार्मिक सुधारकांचा असून तो मुख्यत्वे बाह्मो समाज (स्थापना १८२८) व प्रार्थनासमाज (स्थापना १८६४) यांत व्यक्त झाला आहे. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे, रामचंद्र गोपाळ भांडारकर, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, न्यायमूर्ती नारायण गणेश चंदावरकर इ. मंडळी यात अगणी होती. दुसरा प्रवाह, बुद्धीवादी ब्राह्मण सुधारकांचा होता. आगरकरांसारखे जडवादी किंवा अज्ञेयवादी त्यात अगेसर होते. तिसरा मोठा प्रवाह, ब्राह्मणी संस्कृतीच्या विरूद्ध बंड करणाऱ्या बाह्मणेतरांच्या – बहुजनसमाजाच्या – चळवळीचा होता. ह्याचे आद्यजनक महात्मा जोतीराव फुले होते. या तिन्ही सुधारणा प्रवाहांची सर्वसंमत वैशिष्टये अशी : (१) पाश्चात्त्य विज्ञान पूर्णतः स्वागतार्ह आहे. (२) धर्माशी प्रत्यक्ष सोयरिक नसलेले आधुनिक शिक्षण हाच खरा सुधारणेचा पाया आहे. (३) चातुर्वण्याचे तत्त्वज्ञान किंवा जातिभेद ही संस्था व्यक्तिविकासाला मारक व एकात्म समाजाच्या घडणीतील अडसर असल्यामुळे तिचे समूळ उच्चटन व्हावे; कारण व्यक्तिस्वातंत्र्याच्या पायावर लोकसत्ताक राज्यव्यवस्था भारतात निर्माण होण्याची गरज आहे; मात्र तत्पूर्वी सामाजिक परिवर्तनाची नितांत आवश्यकता आहे. या सर्व तत्त्व–सूत्रांचा प्रारंभ कुटुंबसंस्थेत आणि विवाहसंस्थेत बदल करण्यापासून होतो. त्याकरिता स्त्री–शिक्षण व स्त्री–स्वातंत्र्य यांचा पुरस्कार अपरिहार्य ठरतो. ही सर्वसंमत वैशिष्टये या तिन्ही सुधारणा प्रवाहांत – चळवळीत असली, तरी महाराष्ट्रातील बहुजनसमाजातील सुधारकांचे – बाह्मणेतर सुधारकांचे–प्रश्न मागासलेल्या बहुसंख्य जनतेच्या जीवनाशी निगडित, तर ब्राह्मण सुधारकांचे प्रश्न पांढरपेशा उच्चवर्णीयांच्या जीवनाशी संबद्ध होते. त्यामुळे हिंदू धर्माच्या पूर्वपरंपरेवर मूलोच्छेदी प्रहार करण्याची तीव्र व कठोर प्रवृत्ती निर्माण झाली आणि साधारणतः प्रार्थनासमाजाच्या धर्तीवर पण शूद्रातिशूद्रांच्या खास उद्धारार्थ सत्यशोधक समाजाची स्वतंत्र, स्वावलंबी व पुरोगामी विचारांची संघटना स्थापन करण्यात आली.

महात्मा फुले यांच्या या उच्छेदक प्रवृत्तीला अनेक कारणे आहेत. त्यांतील अत्यंत महत्त्वाचे म्हणजे पेशवाईच्या उत्तरार्धामधील ब्राह्मणी वर्चस्वाचा काळ. या काळात, ब्राह्मणी राज्यात जातिभेदाची तीव्र अंमलबजावणी, बाह्मणेतर जातींना दडपण्याची राज्यकर्त्यांची प्रवृत्ती, शूद्राति–शूद्रांची बेफाट पिळवणूक, कायद्याच्या अंमलबजावणीतील ढळढळीत पक्षपात, बेसुमार भ्रष्टाचार व लाचलूचपत अशी बेबंदशाही व अनागोंदी होती. साहजिकच त्या काळी महाराष्ट्रातील ग्रामीण व नागरी सामाजिक जीवनात बाह्मणांचे धार्मिक व प्रशासकीय क्षेत्रांत पूर्ण वर्चस्व होते. परंपरागत हिंदू धर्माच्या चौकटीच्या पकडीत सर्व समाज गुरफटला होता. त्याचा प्रवर्तक व समर्थक वर्ग विशेषेकरून ब्राह्मण वर्ग होता. ह्या चौकटीविरूद्ध बंड करणारी प्रवृत्ती, सत्यशोधक समाजाच्या रूपाने जागृत झाली आणि मानसिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी म. जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या रूपाने धगधगणाऱ्या बंडाचे निशाण हाती घेतले. धर्माचे मनुजवैरी गुंतवळ आणि ते जपणारे समाजघटक यांच्या अनिष्ट प्रवृत्तींविरूद्ध, जवळजवळ सर्व आघाड्यांवर त्यांनी युद्ध पुकारले.

तात्त्विक बैठक : महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म या ग्रंथात सत्यशोधक समाजाच्या तत्त्वांची मांडणी केली आहे. धर्मभेद आणि राष्ट्रभेद यांच्याविरूद्ध महान सत्य कोणते? असा प्रश्न उपस्थित करून म. फुल्यांनी म्हटले आहे, ''स्वातंत्र्य, समता व बंधुत्व यांच्या पायावर अवघ्या मनुष्यजातीचे एक कुटुंब निर्माण करणे, हेच मनुष्यत्त्वाचे सर्वोच्च ध्येय होय. सर्व मानव, स्त्री किंवा पुरूष यांचे हक्क सारखे आहेत. मानव किंवा कोणताही मानवसमुदाय यांना दुसऱ्या मानवावर वा समुदायावर स्वामित्व गाजविण्याचा, जबरदस्ती करण्याचा सर्वाधिकार नाही. राजकीय व धार्मिक मतांमुळे कोणतीही व्यक्ती उच्च वा नीच मानून तिचा छळ करणे, म्हणजे सत्याचा द्रोह करणे होय. प्रत्येकाला स्वमताचा प्रसार करण्याचा हक्क व अधिकार आहे. सर्वांना ऐहिक जीवन उपभोगण्याचा सारखाच अधिकार आहे. शेती, कलाकौशल्य, मजुरी आदी कामे माणसास हीनपणा आणीत नसून त्यांच्यायोगे त्याची थोरवीच सिद्ध होते. सृष्टीच्या कार्यकारणभावाचा अर्थ ध्यानी घेऊन त्या सृष्टीचा किंवा निसर्गशक्तीचा मनुष्याच्या गरजा भागविण्यासाठी उपयोग करणे, हा मनुष्याचा मूलभूत अधिकार व कर्तव्य होय. या विश्र्वात जगण्याकरिता आणि उपभोगाकरिता वस्तू उत्पन्न करणे किंवा मिळविणे, हे माणसाचे पहिले कर्तव्य आहे. त्याकरिता परस्परांना साहाय्य करणे, हा मानवाचा श्रेष्ठ धर्म आहे; एवढेच नव्हे, तर ही ईश्वराची पूजा आहे. भजन, नामस्मरण, जपजाप्य, प्रार्थना, भक्ती या गोष्टींची ईश्वराला गरज नाही; कारण तो सर्व विश्र्वाचा स्वामी आहे. त्याला माणसाच्या स्तुतीची, भक्तीची मुळीच गरज नाही. ~ बायबल मध्ये येशू क्रिस्तांनी माणसाने माणसाशी कसे वागावे, यासंबंधी केलेला उपदेश माणसाने अंमलात आणला, तर मनुष्यजातीचे जीवन पूर्ण सफल झाले असे समजावे ''. म. फुले यांनी विशद केलेले हे सत्य म्हणजे हजारो वर्षांच्या परिश्रमाने संपादन केलेल्या संस्कृतीचे आणि ज्ञानाचे सार आहे. त्यांनी सत्यज्ञानाचे साधन किंवा प्रमाण कोणते, यासंबंधी समग चर्चा केली आहे. '' शुद्ध सत्य हे धर्मगंथात किंवा ऋषी, गुरू, अवतार व ईश्वर, प्रेषित या कुणांमध्येही नाही; ते मनुष्याच्या सदसद्विवेकबुद्धीत वास करते. निसर्गातील सत्य व नैतिक सत्य ही दोन्ही प्राप्त करून देणारी बुद्धी (रीझन) मनुष्यात स्वाभाविकपणे वसत असते. सृष्टिकर्त्यानेच मनुष्यजातीला दिलेली ती नैसर्गिक देणगी आहे. ईश्वराने – निर्मिकाने – मानवाला एकदाच एकच एक ज्ञानाचा दिव्य ठेवा दिला आहे; तो म्हणजे बुद्धी होय ''. म. फुले यांची सत्यशोधक समाजाविषयीची ही तात्त्विक बैठक पूर्णतः बुद्धीवादी आहे. त्यांना धर्मसंस्था मान्य नाही; मात्र 'निर्मिकाचे म्हणजे सृष्टिनिर्मात्याचे अस्तित्व ते मान्य करतात. निर्मिकाचे सर्वन्यायीपण सिद्ध करण्यासाठी म. फुले यांनी केलेला सज्जड युक्तिवाद मात्र विज्ञानाच्या कसोटीवर कितपत उतरेल ? याबद्दल शंका आहे.

कार्य व उपक्रम : सत्यशोधक समाजाच्या कार्यासाठी म. फुले यांनी घटना बनविली. तद्नुषंगाने नियमावली तयार केली.मूलतः सत्यशोधक समाज एकच निर्मिक, एक धर्म, एक मनुष्यजात मानणारा म्हणून स्थापन झाला. त्याची आचारसंहिता सार्वजनिक सत्यधर्म या गंथात दिली असून, त्यात ढोबळ नियम सांगितले आहेत. त्यांनुसार समाजाच्या कार्यकारिणीत सुरूवातीस म. जोतीराव फुले हे चिटणीस आणि डॉ. विश्राम रामजी घोले हे अध्यक्ष होते. वर्षातून कार्यकारिणीच्या सर्वसाधारण चार सभा, लोकशाही पद्धतीने कार्यकारी मंडळाची निवड व बहुमताने निर्णय, अशी सर्वसाधारण सूत्रे होती. सुरूवातीस दर रविवारी डॉ. गावडे यांच्याकडे अनौपचारिकरीत्या मंडळी जमत. समाजापुढील प्रश्न, सोडवणुकीचे उपाय व सद्य:स्थिती यांविषयी चर्चा होत आणि दर पंधरा दिवसांतून एक व्याख्यान असा उपक्रम असे.

सत्यशोधक समाजातील व्यक्तींनी पुढील काही सूत्रे काटेकोरपणे पाळावीत, अशी भूमिका आहे. (१) ईश्वर (निर्मिक) एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकार व सत्यरूप आहे आणि सर्व माणसे त्याची लेकरे आहेत. या निर्मिकाशिवाय (निर्मात्याशिवाय) मी इतर कशाचीही पूजा करणार नाही. (२) निर्मिकाची भक्ती करण्याचा पूर्ण अधिकार प्रत्येकाला आहे. त्यासाठी पुरोहित किंवा मध्यस्थाची आवश्यकता नाही. (३) माणूस जातीने श्रेष्ठ ठरत नसून गुणांनी श्रेष्ठ ठरतो. (४) निर्मिक सावयव रूपाने अवतरत नाही. (५) पुनर्जन्म, परलोक, मोक्ष, कर्मकांड, जपतप या गोष्टी अज्ञानमूलक आहेत; त्यांचा अवलंब माझ्याकडून होणार नाही. (६) जनावरांना मारण्यात मी सहभागी होणार नाही. (७) दारूच्या व्यसनापासून अलिप्त राहण्याचा मी प्रयत्न करीन आणि (८) समाजाचा खर्च चालावा, म्हणून मी माझ्या उत्पन्नातून काही वर्गणी देईन.

सर्व सभासदांनी सत्याचा प्रसार व सद्विचार लोकांत प्रसृत करून मानवी हक्क व कर्तव्ये यांचा प्रसार–प्रचार वृत्तपत्रे–व्याख्यानांव्दारे करावा. म. फुल्यांनी दलितांना, स्त्रियांना, कष्टकऱ्यांना त्यांच्या दैन्यावस्थेतून बाहेर पडण्यासाठी लोकशिक्षणाचा उपक्रम प्राधान्याने हाती घेतला. शिक्षण सर्वांना सहजलभ्य व्हावे आणि सर्वांनी शिक्षण घ्यावे म्हणून प्रयत्न केला. विद्येची महती त्यांनी शेतकऱ्याचा आसूड या ग्रंथात चपखल शब्दांत वर्णन केली आहे. ते म्हणतात–

विदयेविना मति गेली;
मतिविना नीति गेली।।
तिविना गति गेली;
गतिविना वित्त गेले।।
वित्ताविना शूद्र खचले;
इतके अनर्थ एका अविद्येने केले।।।।

अज्ञानग्रस्त शूद्रातिशूद्रांच्या शाळांबरोबरच त्यांनी मुलींसाठीही शाळा काढल्या. त्यासाठी सावित्रीबाईंनी पुढाकार घेऊन अध्यापनही केले. ज्ञानवृद्धिकारक उपायांना बळकटी देण्यासाठी त्यांनी गरीब व होतकरू विदयार्थ्यांना विदयावेतने व हुशार विदयार्थ्यांना बक्षिसे ठेवली. निबंधलेखन व वक्तृत्वस्पर्धा यांना उत्तेजन दिले. वसतिगृहांची व्यवस्था करण्यात आली. त्यांचे एक सहकारी कृ. पां. भालेकर यांनी वसतिगृह स्थापून परगावच्या गरीब विद्यार्थ्यांची राहण्याची–जेवण्याची व्यवस्था केली. म. फुल्यांनी हंटर कमिशनला दिलेल्या निवेदनात (१८८२) सक्तीच्या शिक्षणाचा आग्रह धरला. पाझरणीच्या सिद्धांताला कडाडून विरोध केला. त्यासाठी लोकहितकारक असे उपायही सुचविले.

सत्यशोधक समाजाने लोकशिक्षणाबरोबरच शेतकऱ्यांची जमीनदार व सावकार यांच्या मगरमिठीतून सुटका करण्यासाठी अथक प्रयत्न केले. दीनबंधू , दीनमित्र वगैरे वृत्तपत्र–मासिकांतून शेतकऱ्यांची गाऱ्हाणी त्यांनी हिरिरीने मांडली. शेतकऱ्याचा आसूड मधून म. फुल्यांनी शासनाच्या नजरेस कृषिवर्गाची दुःस्थिती आणली. त्यामुळेच ' डेक्कन ॲगिकल्चर रिलिफ ॲक्ट ' संमत झाला. दीनबंधू वृत्तपत्राने गिरणीकामगारांची स्थिती सुधारण्याचा पहिला प्रयत्न केला. नारायण मेघाजी लोखंडे यांनी ' मिलहँड असोसिएशन ' स्थापून, फॅक्टरी आयोगापुढे कामगारांची बाजू मांडली. तसेच लहान शेतकऱ्यांना जंगल खात्याच्या अधिकाऱ्यांकडून होणारा उपद्रव दूर केला. जातिभेदखंडन करणारे तुकाराम तात्या पडवळ यांचे जातिभेद विवेकसार, परमहंस सभेचे दादोबा पांडुरंगलिखित धर्मदर्शक आणि म. फुल्यांचे सार्वजनिक सत्यधर्म ह्या गंथांचा सत्यशोधक चळवळीने मार्गदर्शनपर उपयोग केला. तसेच अनिष्ट अंधश्रद्धामूलक परंपरा, चालीरीती, रूढी यांचे समूळ उच्चटन करण्याचा प्रचार केला. १८७९ मध्ये पुण्यातील एका थिएटरमध्ये त्यांनी स्त्रियांच्या निबंधवाचनाचा समारंभ घडवून आणला. शेतकऱ्यांच्या दुःस्थितीबद्दल व पिळवणुकीबद्दल त्यांनी बारामती तालुक्यात चिंचोली गावात शेतकऱ्यांची सभा भरवून (१८८०) शेतसारा, कर्ज, जंगलत्रास, सक्तीचे शिक्षण वगैरैविषयी ठराव संमत केले. एवढेच नव्हे, तर भालेकर यांनी ते, विदर्भ व मध्य प्रदेशात कंत्राटी कामानिमित्त काही महिने गेले असता, तेथे सत्यशोधक समाजाचे प्रचारकार्य केले. महाराष्ट्रातील काही प्रमुख शहरांतून समाजाची केंद्रे निर्माण झाली आणि जनजागृतीच्या उपक्रमाला काही अंशी यश लाभले.

महाराष्ट्राबरोबरच बृहन्महाराष्ट्रातील काही शहरांतून म. फुल्यांच्या सत्यशोधक समाजाची केंद्रे निर्माण झाली आणि जनजागृतीच्या, लोकशिक्षणाच्या चळवळीला वेग आला. कृष्णराव पांडुरंग भालेकर, स्वामी व्यंकय्या रामय्या अय्यावरू, डॉ.विश्राम रामजी घोले, डॉ. संतुजी रामजी लाड, सावळाराम दगडूजी घोलप, महादेव गणेश डोंगरे, हरिश्चंद्र नारायण नवलकर, महादेव राजाराम तारकुंडे, आण्णा बाबाजी लष्ठे, ज्ञानगिरी बुवा, तात्या पांडुरंग सावंत, वा. रा. कोठारी, सखाराम पाटील, मुकुंदराव गणपत पाटील, ॲड.गणपतराव कृष्णाजी कदम, भास्करराव जाधव, हनुमंतराव साळुंखे–पाटील, दांडेगावकर, ॲड. केशवराव बागडे, आनंदस्वामी, रामचंद्र आसवले, केशवराव विचारेगुरूजी, ज्योत्याजीराव फाळके–पाटील, रामचंद्र बाबाजी जाधव उर्फ दासराम, सदोबा गावडे, बंडोबा तरवडे, धोंडीराम नामदेव कुंभार, रामचंद्र गोविंद जामदार, भोसले, सावंत, भाई माधवराव खंडेराव बागल, पुढारी कार ग. गो. जाधव, सत्यवादी कार बाळासाहेब, समाज कार सर्जेराव पाटील, बाळासाहेब देसाई, रायभान जाधव, ॲड. झुलाल पाटील, दौलतराव गोळे, व्यंकटअण्णा रणधीर, नलिनीताई लढके, ॲड. एकनाथराव साळवे, प्राचार्य गजमल माळी, ल. ब. मिसाळ, रामभाऊ फाळके, ॲड. पी. बी. कडू – पाटील, नागनाथअण्णा नायकवडी, ॲड. डी. एस. खांडेकर, माधवराव मुकुंदराव पाटील, ॲड. द. रा. शेळके, ॲड. ना. ह. सावंत, जी. ए. उगले, ग. पां. लोके, बाबा आढाव, हरिभाऊ मुळे, उत्तम नाना पाटील व ॲड. वसंतराव ऊर्फ भाऊ फाळके–पाटील यांसारख्या मोजता येणार नाहीत अशा अनंत छोट्या–मोठया निष्ठावंत कार्यकर्त्यांनी सत्यशोधक चळवळ नेटाने पुढे नेली; आजही प्रयत्न चालू आहेत. परिणामी, संपूर्ण समाजक्रांतीचे युग अवघ्या महाराष्ट्रात सळसळून उभे राहिले. मधे काही काळ, विशेषतः म. फुले यांच्या निर्वाणानंतर (१८९०) तसेच भारताला स्वातंत्र्याची प्राप्ती झाल्यानंतर (१९४७) सत्यशोधक चळवळ खूपच मंदावली, उपेक्षित राहिली; मात्र शंकरराव मोरे, मुकुंदराव पाटील, केशवराव जेधे, भास्करराव जाधव, राजर्षी छत्रपती शाहू महाराज, दिनकरराव जवळकर, लोकशाहीर पिराजीराव सरनाईक प्रभृती व त्यांचे खंदेबळ्ळ सहकारी यांनी सत्यशोधक चळवळ पुनर्जीवित केली, गतिमान केली आणि खेड्यापाड्यांतल्या, तळागळातल्या माणसांपर्यंत नेऊन पोहोचविण्याचा आणि रूजविण्याचा प्रयत्न केला. राजर्षी शाहू महाराजांनी ती उभ्या महाराष्ट्रात वाढविण्याचा प्रयत्न केला.

भारताच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या प्रचंड रणसंग्रामात सर्वांगीण सामाजिक क्रांतीऐवजी देशाच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाला अग्रक्रम राहिला. त्यामुळे सत्यशोधक चळवळ विस्कळीत झाली; तशीच स्वातंत्र्योत्तर काळात, आता स्वातंत्र्य प्राप्त झालं, उद्दिष्ट साध्य झालं; म्हणजे दुसऱ्या कुठल्या उद्दिष्टाची निकड उरली नाही अशी बव्हंशी बहुजन समाजाने समजूत करून घेतली. समोरची उद्दिष्टेही वेगवेगळी झाली. शिवाय मोठ्या प्रमाणात बाह्मणेतर समाज विविध राजकीय पक्षांत विभागला गेला. अशा काही महत्त्वाच्या कारणांमुळे सत्यशोधक चळवळ नुसती मंदावली असेच नव्हे, तर थंडावलीही अशी इतिहासाची नोंद आहे. मात्र इतिहासाकडे पाठ करून ती पुन्हा उसळी मारून फोफावू लागली, ती धारदार विचारांनी दृढ असलेल्या, कडेलोट झाला तरी मागे हटणार नाही या जिद्दीने पेटलेल्या, त्या त्या काल–परिस्थितीमधील नव्या–जुन्या, छोट्या–मोठ्या कार्यकर्त्यांच्या–नेतृत्वाच्या अभंग निष्ठांवर ! सांप्रत जाणवणारे तिचे अस्तित्वही याच ज्वलजहाल आधारावर उभे आहे.

गंथव्यवहाराची मांदियाळी : म. फुले यांच्यापासून आजतागायत सत्यशोधक चळवळीचे गतिमान, वाढते यश, निरनिराळे उपक्रम, कार्यकम हाती घेऊन त्याची काटेकोर अंमलबजावणी करण्यावर निर्भर आहे. कालमानानुसार त्यात बदल, काही सुधारणा संभवत असल्या तरी, छोट्या–मोठया सभा, शेतकऱ्यांचे मेळावे, शेतकरी–कामकरी–कष्टकऱ्यांच्या संघटना, स्पृश्य–अस्पृश्य–महिला अशा 'शूद्रातिशूद्र' समाजघटकासांठी शाळा उघडणे, परिवर्तन शिबिरे आयोजित करणे, नैसर्गिक किंवा मानवी आपत्ती, दुष्काळ, महापूर या संकटांच्या वेळी पुनर्वसनशिबिरे आयोजित करणे, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांची/पुलांची कामे घेणे, निबंध लिहून त्याचे वाचन करणे, छोट्या छोट्या पुस्तिका लिहिणे, सभा–संमेलने–अधिवेशने भरवून बहुजन समाजाला–बाह्मणेतर समाजाला व सरकारला परखडपणे काही गोष्टी सुनावून कृती करायला भाग पाडणे आणि छोटी छोटी नियतकालिके काढून त्यांद्वारा प्रभावी व प्रवाही प्रचार करणे, असे या लोकप्रबोधनकार्याचे सर्वसाधारण स्वरूप राहिले आहे. लोकशाहीमधील लोककल्याणाच्या संस्थांमध्ये प्रवेश करणे, त्यांची स्थापना करणे आणि मोठया प्रमाणात गंथव्यवहाराचे प्रकाशन करणे, हे त्याचे कालसुसंगत असे सांप्रतचे दोन पदर आहेत. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील म.फुले समता प्रतिष्ठान 'एक गाव, एक पाणवठा किंवा देवदासींचे पुनर्वसन, यांसारख्या चळवळी, भाई माधवराव बागल विद्यापीठ, कोल्हापूर या स्वयंसेवी विद्यासंकुलातर्फे शेतकरी–कामगार–महिला–विदयार्थी यांसारख्या दुबळ्या घटकांसाठी सातत्याने राबविले जाणारे विधायक उपक्रम, म. फुले सामाजिक समता प्रतिष्ठानच्या वतीने मागासवर्गीय व तत्सम यांच्या उद्धारार्थ छेडली जाणारी आंदोलने आणि केले जाणारे संघटन अशा संस्था आणि त्यांचे उपक्रम हे सत्यशोधक चळवळीचेच आविष्कार आहेत. विविध समाज माध्यमांवरुन सविनय साभार जी!

!! सत्यशोधक समाज स्थापना दिनाच्या समस्त सत्यशोधक बंधुभगिनींना प्रेरक हार्दिक हार्दिक शुभेच्छा जी !!

**– संकलन व सुलेखन–**
**श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजी.**
**राह. श्रीगुरूदेव प्रार्थनामंदिर जवळ, रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सप– ९४२३७१४८८३.**

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई–मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे–३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# ग्रामरोजगार सहाय्यकांच्या नियुक्तीला ग्रामसभेचे नियंत्रण

## वर्षाला ६ हजार मनुष्यदिनांचे उद्दिष्ट; ₹८ हजार मानधन, पॉज पिरियडमध्ये ₹२,५००; १० हजारांवर २ टक्के प्रोत्साहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/प्रतिनिधी : महाराष्ट्र रोजगार हमी (विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान-ग्रामीण) योजना, २०२६ अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर कार्यरत ग्रामरोजगार सहाय्यकांच्या नियुक्ती, मानधन व कामकाजाच्या निकषांबाबत राज्य शासनाने २२ सप्टेंबर २०२६ रोजी महत्त्वपूर्ण शासन निर्णय जारी केला आहे. मग्रारो-२०२४/प्र.क्र.६३/रोहयो-१० (ई-११८५२८३) या क्रमांकाच्या निर्णयानुसार ग्रामरोजगार सहाय्यकांच्या मानधन तत्त्वावरील नियुक्ती व सेवा समाप्तीवर संबंधित ग्रामसभेचे नियंत्रण राहणार आहे. हे निकष प्रायोगिक तत्त्वावर ३० जून २०२७ पर्यंत लागू राहणार आहेत.

**दरवर्षी ग्रामसभेत निवड**

शासन निर्णयानुसार प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी नियोजित रोजगार हमीच्या कामांसाठी एक पूर्णवेळ ग्रामरोजगार सहाय्यक अनुज्ञेय राहणार आहे. ग्रामरोजगार सहाय्यकाची मानधन तत्त्वावर निवड दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी होणाऱ्या ग्रामसभेत करण्यात येणार आहे. निवड झालेल्या सहाय्यकाची नियुक्ती त्या वर्षाच्या १ सप्टेंबरपासून पुढील वर्षाच्या ३१ जुलैपर्यंत राहणार आहे. त्यानंतर पुढील वर्षासाठी पुन्हा ग्रामसभेत निवड करावी लागणार आहे.

नवीन सहाय्यकाची निवड होईपर्यंत पूर्वी कार्यरत असलेला ग्रामरोजगार सहाय्यक संबंधित रोजगार हमीचे कामकाज पाहणार आहे. मात्र, पूर्वीच्या सहाय्यकाला मुदतवाढ द्यायची की नाही, याचा निर्णय ग्रामसभा घेणार असून त्यासाठी मागील आर्थिक वर्षात निर्माण केलेले मनुष्यदिवस, कामाची गुणवत्ता, योजनेअंतर्गत केलेले काम आणि नोंदी अद्ययावत ठेवल्या आहेत की नाही, हे निकष विचारात घ्यावे लागणार आहेत.

**अतिरिक्त सहाय्यकासाठी आयुक्तांची पूर्वमंजुरी**

कामाचा मोठा व्याप असल्यामुळे एखाद्या ग्राम पंचायतीला एकापेक्षा अधिक ग्राम रोजगार सहाय्यकांची आवश्यकता असल्यास केवळ ग्रामसभेच्या ठरावावर नियुक्ती करता येणार नाही. लगतच्या तीन वर्षांतील रोजगार हमीच्या कामांतून निर्माण झालेल्या मत्ता व मनुष्यदिवसांच्या माहितीच्या आधारे ग्रामसभेने ग्राम पंचायतीमार्फत आयुक्त, विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण), नागपूर यांच्याकडे प्रस्ताव सादर करून पूर्वमंजुरी घेणे आवश्यक आहे.

आयुक्तांची पूर्वमंजुरी न घेता एकापेक्षा अधिक ग्रामरोजगार सहाय्यकांची नियुक्ती केल्यास त्या अतिरिक्त नियुक्तीस मानधन अनुज्ञेय राहणार नाही.

**वर्षाला ६ हजार मनुष्यदिवसांचे उद्दिष्ट**

ग्रामरोजगार सहाय्यकांसाठी शासनाने कामगिरीशी संबंधित स्पष्ट निकष निश्चित केले आहेत. प्रत्येक सहाय्यकाने एका वर्षात किमान ६ हजार मनुष्यदिवसांची निर्मिती करणे आवश्यक आहे. तसेच नियुक्तीनंतरच्या पहिल्या सहा महिन्यांत एकूण उद्दिष्टाच्या किमान ५० टक्के म्हणजेच ३ हजार मनुष्यदिवस निर्माण करणे बंधनकारक आहे.

निर्धारित मनुष्यदिवसांचे उद्दिष्ट पूर्ण न करणारा ग्रामरोजगार सहाय्यक ग्रामसभेमार्फत मानधन तत्त्वावरील सेवा समाप्तीस पात्र ठरेल.

**१० हजारांपेक्षा जास्त मनुष्यदिवसांवर २ टक्के प्रोत्साहन**

एखाद्या ग्रामरोजगार सहाय्यकाने वर्षभरात १० हजारांपेक्षा जास्त मनुष्यदिवस निर्माण केल्यास त्याला शासनाच्या ३ ऑक्टोबर २०२४ च्या निर्णयानुसार २ टक्के प्रोत्साहनपर रक्कम देय राहणार आहे. त्यासोबत प्रवासभत्ता आणि डेटा पॅकची सुविधाही स्वतंत्रपणे देय राहणार आहे.

**नियमित मानधन ₹८ हजार**

ग्रामरोजगार सहाय्यकांना नियमित कालावधीत दरमहा ₹८ हजार मानधन देण्याची तरतूद पूर्वीच्या ३ ऑक्टोबर २०२४ च्या शासन निर्णयानुसार कायम आहे. हे मानधन आयुक्त, विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण), नागपूर यांच्यामार्फत संबंधित ग्रामपंचायतीला वितरित करण्यात येणार आहे.

**पॉज पिरियडमध्येही मानधन**

दरवर्षी साधारण दोन महिने रोजगार हमीची कामे बंद असलेल्या कालावधीला 'पॉज पिरियड' संबोधले जाते. या काळात ग्रामरोजगार सहाय्यकांना पूर्णपणे काममुक्त केले जाणार नाही. त्यांना जॉबकार्ड पडताळणी, नोंदवही व रजिस्टर अद्ययावत करणे, लाभार्थी व मजूर नोंदींची तपासणी, ई-केवायसी, अभिलेख अद्ययावत करणे, योजनेची प्रसिद्धी तसेच तालुका कार्यक्रम अधिकारी व ग्रामसेवकांना मदत करणे अशी कामे करावी लागणार आहेत.

या दोन महिन्यांच्या पॉज पिरियडमध्ये ग्रामरोजगार सहाय्यकास दरमहा ₹२,५०० मानधन अनुज्ञेय राहणार आहे.

**ई-केवायसीची जबाबदारी सहाय्यकांवर**

ग्रामपंचायत क्षेत्रातील रोजगार हमी योजनेत नोंदणीकृत असलेल्या सर्व मजुरांचे ई-केवायसी पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित ग्रामरोजगार सहाय्यकाची राहणार आहे. यासाठी ग्रामपंचायतीने सहाय्यकाला आवश्यक प्रणाली, सुविधा व तांत्रिक सहकार्य उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

**तक्रारी झाल्यास सेवा समाप्तीची तरतूद**

ग्रामरोजगार सहाय्यकाने सरपंच, ग्रामसेवक किंवा तालुका कार्यक्रम अधिकाऱ्यांना योजनेशी संबंधित कामात सहकार्य न करणे, ग्रामपंचायतीअंतर्गत निश्चित रोजगार हमीची कामे करण्यास टाळाटाळ करणे किंवा कामकाजाबाबत तक्रारी निर्माण होणे, अशा प्रकरणांत ग्रामसभा त्याच्या मानधन तत्त्वावरील नियुक्तीच्या सेवा समाप्तीचा प्रस्ताव ग्रामपंचायतीमार्फत आयुक्तांकडे सादर करू शकते.

अशा प्रकारे सेवा समाप्त झालेल्या संबंधित व्यक्तीस पुनर्नियुक्ती देऊ नये, अशी स्पष्ट तरतूद शासन निर्णयात करण्यात आली आहे.

**ग्रामसभेला मोठी जबाबदारी**

नव्या व्यवस्थेत ग्रामरोजगार सहाय्यकाची निवड, मुदतवाढ आणि सेवा समाप्तीच्या प्रक्रियेत ग्रामसभेला महत्त्वाची भूमिका देण्यात आली आहे. मात्र निवडीचा तपशील ग्रामसभेने ग्राम पंचायतीमार्फत आयुक्त, विकसित भारत रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण), नागपूर यांना कळविणे बंधनकारक आहे. त्यामुळे नियुक्तीची प्रक्रिया ग्रामसभेच्या निर्णयापुरती मर्यादित न राहता संबंधित प्रशासकीय यंत्रणेलाही त्याची माहिती देणे आवश्यक ठरणार आहे.

**३० जून २०२७ पर्यंत प्रायोगिक अंमलबजावणी**

ग्रामरोजगार सहाय्यकांच्या कामकाजासंदर्भातील हे नवीन निकष ३० जून २०२७ पर्यंत प्रायोगिक तत्त्वावर लागू राहणार आहेत. या कालावधीतील योजनेच्या फलनिष्पत्तीचा आढावा घेऊन शासन स्तरावर आवश्यकतेनुसार पुढील बदल करण्यात येणार आहेत.

शासनाच्या या निर्णयामुळे ग्रामरोजगार सहाय्यकांच्या नियुक्तीपासून मुदतवाढ, मानधन आणि सेवा समाप्तीपर्यंतच्या प्रक्रियेत ग्रामसभेची जबाबदारी वाढली असून, रोजगार निर्मितीच्या उद्दिष्टपूर्तीलाही थेट महत्त्व प्राप्त झाले आहे.

---

# नळदुर्ग येथे भाजप कार्यालयात गणपतीची महाआरती; पावसासाठी सभापती तानाजी जाधव यांचे साकडे



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग या ऐतिहासिक शहरातील भाजप कार्यालयात गणपती बाप्पांच्या आगमनानिमित्त उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. गणपती बाप्पांची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आल्यानंतर भक्तिभावाने महाआरती करण्यात आली. यावेळी मोठ्या संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. नळदुर्ग नगरीचे पाणीपुरवठा सभापती तानाजी जाधव यांच्या हस्ते गणपती बाप्पांची महाआरती करण्यात आली. यावेळी गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या; तसेच नळदुर्ग परिसरात चांगला पाऊस पडू द्या, अशी प्रार्थना करत नळदुर्ग नगर परिषदेचे पाणीपुरवठा सभापती जाधव यांनी गणरायाला साकडे घातले.

**गणपती बाप्पा मोरया... पाऊस लवकर पडू द्या! अशी गणरायाला प्रार्थना**

यावेळी नळदुर्ग शहर पत्रकार संघाचे ज्येष्ठ पत्रकार विलास येडगे, पत्रकार संघाचे अध्यक्ष सुहास येडगे, नळदुर्ग नगरीचे माजी नगरसेवक सुधीर भैय्या हजारे, पत्रकार संघाचे सदस्य उत्तम बनजगोळे, सामाजिक कार्यकर्ते व ८ फार्माचे मुख्य प्रवर्तक संजय दशरथ जाधव, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे संचालक तथा भावी चेअरमन रघुनाथ आप्पा नागणे, नळदुर्ग शहर भाजपचे माजी अध्यक्ष पद्माकर घोडके, अबु अल हसन रजवी, पत्रकार दादासाहेब बनसोडे, भाजप कार्यालयाचे व्यवस्थापक प्रमोद जाधव यांच्यासह अनेकांनी महाआरतीमध्ये सहभाग घेतला. महाआरतीनंतर उपस्थितांना पेढे वाटून गणपती बाप्पांच्या आगमनाचा आनंदोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी परिसरात गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषाने भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.

---

# सकल मातंग समाजाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन; एस. सी.उपवर्गीकरण त्वरीत लागू करा : भाई बजरंग ताटे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब (प्रतिनिधी) महाराष्ट्र राज्यात अनुसूचित जाती प्रवर्गात उपवर्गीकरण त्वरीत लागू करावे या मागणीसाठी सकल मातंग समाजाच्या वतीने महाराष्ट्राचे मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांना धाराशिव जिल्हा दुष्काळी भागाची पहाणी करण्यासाठी आले असता त्यांना सकल मातंग समाजाच्या वतीने समाजाचे नेते भाई बजरंग ताटे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले.

दिलेल्या निवेदनात असे म्हटले आहे की,अप्रगत जातींना लाभ मिळावा व सामाजिक समता प्रस्थापित व्हावी म्हणून कै. डॉ. बाबासाहेब गोपले व समाज बांधव चार दशकांपासून उपवर्गीकरणासाठी संघर्ष करत आहेत.

राज्यभरात शेकडो वेळा धरणे, रस्ता रोको, सत्याग्रह, जवाब दो, दवंडी आंदोलन व लाखोंचे जन आक्रोश मोर्चे काढूनही सरकारने उपवर्गीकरण केले नाही. ०१ ऑगस्ट २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने उपवर्गीकरणाचा अधिकार राज्याला असल्याचा ऐतिहासिक निकाल दिला आहे. पंजाब, हरियाणा, तेलंगणा, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, कर्नाटक सरकारने अंमलबजावणी केली, पण महाराष्ट्राने अजूनही निर्णय घेतला नाही.

संविधानातील न्याय, समता, स्वातंत्र्य, बंधुत्वानुसार महाराष्ट्रात उपवर्गीकरण त्वरीत लागू करावे, अन्यथा दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत आझाद मैदान मुंबई येथे धाराशिव जिल्ह्यातील लाखो मातंग बांधव उपवर्गीकरण निर्धार महामोर्चात सामील होतील, असा इशारा देण्यात आला आहे.



या निवेदनावर श्रमीक मानवाधिकार संघाचे भाई बजरंग ताटे,जिल्हाध्यक्षा सौ. माया शिंदे, लहुजी शक्ती सेनेचे बालाजी गायकवाड, मानव अधिकार आंदोलन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हनुमंत पाटुळे, बापू खंडागळे, रणजित कसबे, अमोल ओव्हाळ, महादेव शिंदे, बाळासाहेब कांबळे, आकाश राजहंस, महादेव कांबळे, नवनाथ भंडारे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

---

# जि.प. गादेगाव पंढरपूर शाळेस बालाजी अमाईन्सच्यावतीने खेळाचे साहित्य भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : ( प्रतिनिधी : नागेश श्रीचिप्पा) बालाजी अमाईन्सच्यावतीने सीएसआर अंतर्गत सोलापूर जिल्हयातील जिल्हा परिषद प्राथमिक केन्द्र शाळा गादेगाव ता पंढरपूर या शाळेस लहान मुलांकरीता बागेतील किडासाहित्य व प्लेस्टेशन तसेच स्प्रिंग राईडर, सीसॉ, मेरि गो राऊंड, हॉर्स राईडर असे नविन साहित्य देण्यात आले. जिल्हा परिषद शाळेस असे नविन पध्दतीचे खेळचे प्लेस्टेशन व साहित्य सोलापूर जिल्हयात प्रथमच करण्यात आल्या मूळे गादेगावातील विदयार्थी, पालक, शिक्षकांनी बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक श्री राम



रेडडी व संचालक मंडळाचे आभार मानले बालाजी अमाईन्सच्यावतीने विदयार्थ्यांच्या शारीरिक, मानसिक व सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असणारे प्लस्टेशन (मेरि गो राऊंड , सी सॉ, स्विंग रायडर, हॉर्स रायडर ) असे नविन पध्दतीचे सात लाख रूपये किंमतीचे खेळाचे साहित्य भेट देण्यात आले बालाजी अमाईन्सचे श्री अनिल विपत (सीएसआर विभागप्रमुख) यांच्या हस्ते या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी बालजी अमाईन्सचे अमोल गुंड (परचेस मॅनेजर) यांनी बालजी अमाईन्सच्या सीएसआर विभागाचे शिक्षण व आरोग्य तसेच किडा या क्षेत्रात विशेष प्राधान्य देत संचालक मंडळ व व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी यांनी विविध उपकमास मदत केली आहे. मुलांना शिक्षणा सोबत किडा क्षेत्रातही प्रोत्साहान मिळावे या करीता बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी सर व सर्व संचालक मंडळयांचा हा मुख्य उददेश आहे . साहित्य प्रदान सोहळयाच्या कार्यकम प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री चंद्रकांत बागल गुरुजी यांनी गादेगाव जिल्हा परिषद शाळेचे मैदान आता सध्या एका इंग्रजी शाळेचे मैदाना प्रमाणे झाले आहे हे केवळ बालाजी अमाईन्सच्या संचालक मंडळ व व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी सर यांच्या दूरदृष्टी मुळे गावातील मुलांना प्लेस्टेशन व सस्पेशन ब्रिज, स्प्रिंग, सीसॉ, मेरि गो राऊंड, हॉर्स रायडिंग, अश्या नविन प्रकारचे खेळाचे साहित्य खेळण्यास मिळणार आहे त्या बददल बालाजी अमाईन्सच्या सर्व संचालक मंडळाचे व व्यवस्थापकीय संचालक राम रेडडी सरांचे आभार मानले .

कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शरदचंद्र चाटे गुरुजी, आभार प्रदर्शन विजय बागल गुरुजी तसेच बालाजी अमाईन्सचे सीएसआर प्रमुख अनिल विपत व अमोल गुंड परचेस मॅनेजर तसेच गावातील नागरिक, पालक , विदयार्थी शिक्षक उपस्थित होते .


---

**ज्ञानेश्वर चिंतेवार यांच्या घरातील देखाव्यात परंपरा, संस्कृती आणि जुन्या जीवनशैलीचे दर्शन**

# भिवंडी मानसरोवरमध्ये गणेशोत्सवातून उलगडली चाळ संस्कृतीची अनोखी झलक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडीतील मानसरोवर परिसरात यंदाच्या गणेशोत्सवानिमित्त ज्ञानेश्वर चिंतेवार यांच्या घरी साकारण्यात आलेल्या आकर्षक देखाव्याने नागरिकांचे लक्ष वेधून घेतले आहे. पारंपरिक चाळ संस्कृती, जुन्या काळातील जीवनपद्धती आणि परस्पर सहकार्याची भावना या देखाव्यातून प्रभावीपणे मांडण्यात आली आहे.



मुंबईसह परिसरातील जुन्या चाळींमध्ये दिसणारे सामूहिक जीवन, शेजारधर्म, सण-उत्सवातील सहभाग आणि एकमेकांना मदतीचा हात देण्याची परंपरा यांची सुंदर मांडणी या देखाव्यात करण्यात आली आहे. घरातील गणरायाच्या मूर्तीभोवती उभारण्यात आलेल्या विविध प्रतिकृती आणि सजावटीतून जुन्या काळातील चाळीचे वातावरण जिवंत करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, देखाव्यातील बारकावे लक्षवेधी ठरत असून पारंपरिक वस्तू, घरांची रचना, चाळीतील दैनंदिन जीवन आणि सांस्कृतिक वातावरण यांचे चित्रण करण्यात आले आहे. त्यामुळे गणेशदर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना केवळ धार्मिक अनुभव न मिळता जुन्या चाळ संस्कृतीची आठवणही करून देणारा हा देखावा ठरत आहे.

आजच्या बदलत्या जीवनशैलीत लोप पावत चाललेल्या सामूहिकता, आपुलकी आणि परस्पर सहकार्याच्या मूल्यांना या देखाव्यातून उजाळा देण्यात आला आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून संस्कृती आणि परंपरेची जपणूक करण्याचा ज्ञानेश्वर चिंतेवार यांचा हा उपक्रम परिसरात कौतुकाचा विषय ठरत आहे.

---

# श्रृती पाटील यांच्या शास्त्रीय गायनासह अभंग-भजनांनी पंढरपूरकर रसिक मंत्रमुग्ध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

श्री क्षेत्र पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने आयोजित श्री गणेशोत्सव संगीत महोत्सवात मुंबई येथील ख्यातनाम गायिका श्रृती पाटील यांनी शास्त्रीय गायनासोबतच अभंग-भजनांची सुरेल मैफिल सादर करून पंढरपूरकर कला रसिकांना मंत्रमुग्ध केले.

सहअध्यक्ष ह.भ.प. गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या संगीत महोत्सवातील पाचव्या दिवशीच्या गायन पुष्पाची सुरुवात श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे सदस्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज जळगांवकर, सदस्या ड. माधवी निगडे, सदस्य ह.भ.प. प्रकाश महाराज जवंजाळ, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम तसेच मान्यवर कलाकारांच्या हस्ते श्री विठ्ठलाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली.

यावेळी श्रृती पाटील यांच्या स्वरातील 'माझे माहेर पंढरी' हा अभंग युट्यूबवर प्रसारित करण्यात आला. तसेच त्यांच्या आजोबांचे, भजनसम्राट रायगडभूषण श्री. निवृत्तीबुवा चौधरी यांनी १०८ रागांतील अभंग नोटेशनसहित प्रकाशित केलेले 'भजनछंद' हे पुस्तक विठुरायाच्या चरणी अर्पण करून आशीर्वाद घेण्यात आला.

**'पायलीया झनकार बाजे', 'रंग ना डालो श्यामजी'सह अभंगांची सुरेल मेजवानी; भक्तिरसात रंगली संगीत मैफिल**

मैफिलीची सुरुवात पुरीया धनाश्री रागातील 'पायलीया झनकार बाजे' या बंदिशीने झाली. त्यानंतर 'रंग ना डालो श्यामजी' या सुरेल बंदिशीने रसिकांची दाद मिळवली. पुढे वारकरी संप्रदायाचा बीजमंत्र 'जय जय राम कृष्ण हरी', 'रूप पाहता लोचनी', 'माझे माहेर पंढरी', 'अबीर गुलाल उधळीत रंग', 'अवघे गरजे पंढरपूर' आणि 'सुखाचे जे सुख चंद्रभागे तटी' या अभंगांनी संपूर्ण वातावरण भक्तिमय झाले.

कार्यक्रमाची सांगता 'स्वामी कृपा कधी करणार' या भावस्पर्शी भैरवीने झाली. श्रृती पाटील यांच्या गायनाला हार्मोनियमवर आबासाहेब परकाळे, पखवाजवर ज्ञानेश्वर दुधाणे, तबल्यावर गणेश लोहार आणि टाळावर माऊली पिसे यांनी सुरेल साथसंगत केली.

यावेळी पंढरपूरच्या कला रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या अविस्मरणीय संगीत मैफिलीचा आनंद घेतला. कार्यक्रमानंतर सर्व कलाकारांचा श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

**आज 'कल्चर शिदोरी'ने रंगणार संगीत महोत्सवाचा समारोप**

श्री गणेशोत्सव संगीत महोत्सवाचा आज समारोप होत असून 'कल्चर शिदोरी' हा विशेष सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात येणार आहे. पंढरपूरकर कला रसिकांनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून सांस्कृतिक मेजवानीचा आनंद घ्यावा, असे आवाहन श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्री विठ्ठल मूर्ती वज्रलेप कामाची जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांच्याकडून पाहणी

## जिल्हाधिकारी एस कार्तिकीयेन यांनी दिल्या विविध गणेश मंडळांना भेटी





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल-रुक्मिणीच्या मूर्तीचे दीर्घकालीन जतन, संरक्षण व संवर्धन करण्याच्या दृष्टीने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण व राज्य पुरातत्त्व विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली संवर्धनाचे काम सुरू आहे. श्री विठ्ठलाच्या मूर्ती संवर्धनासाठी वज्रलेप प्रक्रिया करण्यात येत असून,या वज्रलेप कामाची पाहणी आज जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांनी केली.

यावेळी त्यांच्या समवेत मंदिर समितीचे सदस्य ज्ञानेश्वर महाराज जळगावकर, शिवाजी महाराज मोरे, प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, व्यवस्थापक प्रवीणकुमार घम पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक विलास वाहने, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाचे डॉ. एस विनोद कुमार, डॉ. विमल जयस्वाल, निलेश महाजन, आदी उपस्थित होते.

श्री विठ्ठल मूर्ती संवर्धन प्रक्रिया अत्यंत काळजीपूर्वक व शास्त्रीय पद्धतीने पार पाडण्यात येत आहे. मूर्तीच्या प्राचीन स्वरूपास, पावित्र्यास अथवा धार्मिक परंपरांना कोणतीही बाधा निर्माण होणार नाही, याची विशेष काळजी घेऊन श्रींच्या मूर्तीस वज्रलेप प्रक्रिया पूर्ण करावी अशा सूचना जिल्हाधिकारी एस कार्तिकीयेन यांनी दिल्या. तसेच यावेळी श्री विठ्ठल सभा मंडप येते मंदिर समितीकडून स्थापन करण्यात आलेल्या श्री गणेशाची आरती यावेळी जिल्हाधिकारी कार्तिकेयन यांच्या हस्ते करण्यात आली.

**लायडर स्कॅनिंग –**

विठ्ठल रुक्मिणीच्या मुर्तीवर वज्रलेप करताना अगोदर मुर्तीचे लायडर स्कॅनिंग करण्यात आले आहे. हे स्कॅनिंग भविष्यात कराव्या लागणाऱ्या प्रक्रियेकरीता महत्वाचे ठरणार आहे. मूर्तीची डिजीटल ट्वीन तयार करण्यात आली आहे. यामुळे मुर्तीची झीज होत आहे की नाही, झाली तर नेमकी कोणत्या ठिकाणी झाली. हे समजणार आहे. मुर्ती हाताळताना पुजाऱ्यांना पुरातत्व विभागाकडून मार्गदर्शन करण्यात आले आहे. पुरातत्व विभागाकडून लायडर स्कॅनिंगचा अहवाल सल्लागार समितीला १२ दिवसात देण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांनी सांगितले.

**जिल्हाधिकारी एस कार्तिकीयेन यांनी दिल्या विविध गणेश मंडळांना भेटी**

जिल्हाधिकारी एस कार्तिकेयन यांनी आज पंढरपूर येथील गणेश सेवा गणेश उत्सव मंडळ, शिवप्रेमी गणेशोत्सव मंडळ, शिवछत्रपती गणेशोत्सव मंडळ, न्यू छत्रपती संभाजी महाराज मित्र मंडळ व सहकार गणेशोत्सव मंडळ येथे भेट देऊन श्री गणेशाची मनोभावे आरती केली. यावेळी त्यांच्या समवेत प्रांताधिकारी सचिन इतापे उपस्थित होते.

## श्री गणेश विसर्जन : गणेशमूर्ती दान करण्याचे जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांचे आवाहन




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर, (जिमाका) : सोलापूर जिल्ह्यात आतापर्यंत सरासरी ४५ टक्के पाऊस झाला आहे. जिल्ह्यात पाण्याची टंचाई निर्माण झाली असून, जिल्ह्यातील सहा मध्यम प्रकल्पांमध्ये ३० टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा आहे. काही मध्यम प्रकल्पांमध्ये तर १० टक्क्यांपेक्षाही कमी पाणीसाठा आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व गणेश मंडळे तसेच नागरिकांनी गणेश विसर्जनाच्या वेळी गणेशमूर्ती दान करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले आहे.

जिल्ह्यात कमी पाणीसाठा असलेल्या ठिकाणी गणेशमूर्तींचे विसर्जन केल्यास पाणी प्रदूषण होण्याची शक्यता आहे. कमी पाणीसाठा असलेल्या ठिकाणचे पाणी पुढील सहा ते सात महिने वापरता येणे आवश्यक आहे. त्यामुळे पाण्याचे प्रदूषण टाळण्यासाठी नागरिकांनी गणेश विसर्जनाबाबत आवश्यक ती दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले आहे.

गणेश विसर्जनासाठी शक्य असल्यास छोटा कुंभ किंवा पात्र तयार करून त्यामध्ये गणेशमूर्तीचे विसर्जन करावे आणि त्या पाण्याचा योग्य पद्धतीने पुनर्वापर करावा. पर्यावरणाचे तसेच उपलब्ध पाणीसाठ्याचे संरक्षण करण्यासाठी गणेश मंडळे आणि नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असेही जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी आवाहन केले आहे.

## कतारणी येथे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू निदान शिबिर उत्साहात संपन्न



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : सामाजिक बांधिलकी जपत कातरणी येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर. चेअरमन संदीप रतन जाधव यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून 'एस. जे. अर्बन परिवार' यांच्या वतीने, 'कृष्णाई मल्टी-स्पेशालिस्ट हॉस्पिटल (लासलगाव)' व 'उत्तम ऑप्टिशियन (विंचूर)' यांच्या संयुक्त विद्यमाने या भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

कातरणी येथील विठ्ठल मंदिराशेजारील एस. जे. अर्बन कार्यालयात बुधवार, दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते ११ या वेळेत हे शिबिर पार पडले. कार्यक्रमाचा शुभारंभ गोवर्धन आण्णा कदम यांच्या शुभहस्ते फीत कापून करण्यात आला.

या शिबिरामध्ये तज्ज्ञ डॉक्टरांकडून कॉम्प्युटरद्वारे (संगणकीय) रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच डोळ्यांचे विकार, काळजी व संरक्षणाबाबत उपस्थितांना मार्गदर्शन करण्यात आले. तपासणीदरम्यान गरजू आढळलेल्या रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी तसेच सवलतीच्या दरात चष्मे उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक सहकार्य व मार्गदर्शन करण्यात आले. निरोगी डोळे सुंदर भविष्य! या घोषवाक्याद्वारे नागरिकांमध्ये नेत्र आरोग्याविषयी जनजागृती करण्यात आली.

या आरोग्य उपक्रमाला परिसरातील ज्येष्ठ नागरिक, महिला व ग्रामस्थांनी मोठा प्रतिसाद देत तपासणीचा लाभ घेतला. वाढदिवसाच्या निमित्ताने अनावश्यक खर्चाला फाटा देऊन थेट जनतेच्या आरोग्याशी निगडित सामाजिक उपक्रम राबवल्याबद्दल उपस्थितांनी एस. जे. अर्बन परिवाराचे व चेअरमन संदीप जाधव यांचे विशेष कौतुक केले.

याप्रसंगी राजकीय व सामाजिक क्षेत्रातील विविध मान्यवर, गावातील ग्रामस्थ, एस. जे. अर्बन परिवाराचे पदाधिकारी, कर्मचारी वर्ग तसेच तपासणीसाठी सहकार्य करणारे कृष्णाई हॉस्पिटलचे तज्ज्ञ डॉक्टर आणि उत्तम ऑप्टिशियनची टीम व एस जे अर्बनचे सर्व कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होती.

## रुणवाल नगर येथे विघ्नहर्ता प्रतिष्ठानतर्फे महाआरती व महाप्रसाद उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड येथील रुणवाल नगर भागात सार्वजनिक गणेशोत्सव भक्ती भावाने साजरा होत आहे. विघ्नहर्ता प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या गणेशोत्सवात आज विशेष महाआरती व महाप्रसादाचा (भंडारा) कार्यक्रम पार पडला.या प्रसंगी निफाड विधानसभेचे आमदार दिलीपकाका बनकर यांच्या शुभहस्ते श्रींची महाआरती करण्यात आली.

शहरांमधील विविध क्षेत्रांतील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. निफाडचे उप नगराध्यक्ष अनिल अण्णा कुंदे, माजी नगराध्यक्ष रत्नमालाताई कापसे, नगरसेवक साहेबराव बर्डे, सागर कुंदे, माजी नगरसेवक देवदत्त कापसे, दिलीप कापसे तसेच सीताराम बागडे आदी मान्यवर उपस्थित होते.

भाविक भक्ताना या वेळी महाप्रसादाचा वाटप करण्यात आले....सामाजिक सलोखा आणि धार्मिक परंपरा जपण्याचे हे कार्य दरवर्षीप्रमाणेच भविष्यातही अविरतपणे सुरू राहील, असा विश्वास मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रसंगी व्यक्त केला.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विघ्नहर्ता प्रतिष्ठानच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कळंब पंचायत समिती येथे महीलांची तालुकास्तरीय संवाद कार्यशाळा संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : स्वयम् शिक्षण प्रयोग संस्थेच्या वतीने पंचायत समितीच्या सभागृहात आज दि. २२ सप्टेंबर रोजी तालुकास्तरीय संवाद कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. या कार्यशाळेत शेतकरी महिला व व्हिलेज क्शन ग्रुप (व्ही. ए.जी) लीडर्सनी सहभाग घेतला. यावेळी १५० हून अधिक महिलांनी संवाद साधला.

या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी पंचायत समितीच्या सभापती राजश्री वरपे, उपसभापती प्रणिता चव्हाण, संस्थेच्या जिल्हा संघटक दिलशाद तांबोळी, सहाय्यक गटविकास अधिकारी मनीषा सुकाळे, सामाजिक कार्यकर्ते सचिन क्षीरसागर, पत्रकार माधवसिंग राजपूत यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी मार्गदर्शन करताना सभापती राजश्री वरपे म्हणाल्या, आता महिलांनी स्वावलंबी बनले पाहिजे. सततच्या दुष्काळामुळे शेती तोट्याची होत आहे. त्यामुळे महिलांनी बचत गटाच्या व वैयक्तिक माध्यमातून पशुपालन, शेळीपालन, लघु व कुटीर उद्योग आणि शेतीपूरक जोडधंदा करावा. तसेच मुलांच्या शिक्षणाकडे लक्ष द्यावे. संध्याकाळी ७ ते ९ या वेळेत मुलांच्या अभ्यासासाठी टीव्ही, मोबाईल बंद ठेवावेत.

उपसभापती प्रणिता चव्हाण यांनी सांगितले की, स्वयम् शिक्षण प्रयोग संस्था महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी कार्य करीत असून महिला सक्षम बनली पाहिजे.

सहाय्यक गटविकास अधिकारी मनीषा सुकाळे म्हणाल्या, आजही समाजात बालविवाह सारख्या चुकीच्या प्रथा सुरू आहेत. त्यासाठी सुधारणावादी विचारांची गरज आहे. महिलांनी संधीचा उपयोग करून घ्यावा. तसेच प्रास्ताविक भाषणात जिल्हा संघटक दिलशाद तांबोळी यांनी स्वयं शिक्षण प्रयोग (एस.एस.पी) संस्थेच्या कार्याची माहिती दिली. नैसर्गिक शेतीसाठी राष्ट्रीय नैसर्गिक शेती मिशन आणि डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन या योजनांबद्दल माहिती दिली. शेतकरी गट स्थापन करून त्यात महिलांना जोडणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच महिलांच्या कंपनीबद्दल मार्गदर्शन केले. पत्रकार माधवसिंग राजपूत यांनी महिलांना व्यवसाय आणि मार्केटिंग बद्दल माहिती दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्योती महाजन यांनी केले, तर आभार पूजा भवर यांनी मानले.

ही कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी राधा डिकले, ज्योती महाजन, संगीता पालकर, पूजा भवर, राजश्री चव्हाण, आशा पाचभाई, छाया चंदनशिवे, कल्पना नाईकनवरे, सुलोचना भोरे यांनी परिश्रम घेतले.

**लाभ घेण्याचे मुख्याधिकारी महेश रोकडे यांचे आवाहन**

# नगरपालिका प्रशासनाकडून नागरिकांसाठी विविध कल्याणकारी योजना

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : शहरी भागातील नागरिकांचे राहणीमान सुधारण्यासाठी, पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना सक्षम करण्यासाठी नगरपालिका प्रशासनाच्या वतीने विविध शासकीय व स्थानिक पातळीवरील कल्याणकारी योजना राबविल्या जात आहेत. या योजनांचा लाभ शहरातील जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन मुख्यधिकारी महेश रोकडे यांनी केले आहे.

गणेशोत्सवातील भक्तीमय वातावरणाला लोकहिताच्या संवादाची जोड देत शासनाच्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी 'लोकसंवाद-२०२६' उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत संभाजी नगर, पंढरपूर येथील छत्रपती संभाजी नगर, गणेश उत्सव तरुण मंडळात विविध जनजागृतीपर कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.






ावेळी मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी 'दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय शहरी उपजीविका अभियान' अंतर्गत बेरोजगार तरुणांना मोफत कौशल्य प्रशिक्षण, 'प्रधानमंत्री आवास योजना - शहरी' अंतर्गत शहरातील बेघर आणि कच्च्या घरात राहणाऱ्या पात्र कुटुंबांना पक्के घर बांधण्यासाठी थेट आर्थिक अनुदान, शहरातील गरीब व गरजू रुग्णांसाठी पालिकेच्या रुग्णालयांमध्ये मोफत उपचारांची सोय, सफाई कामगारांसाठी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रमसाफल्य आवास योजना, निराधार, वृद्ध आणि दिव्यांग नागरिकांसाठी श्रावणबाळ योजना व संजय गांधी निराधार योजना, 'स्वच्छ महाराष्ट्र अभियान २.०' आणि 'नगरोत्थान महाभियान' अंतर्गत शहरात नवीन अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा वाहिनी, सांडपाणी व्यवस्थापन आणि वस्ती सुधार योजनांबाबत माहिती दिली.

यावेळी मोबाईल आणि इंटरनेट हे ज्ञान व माहिती मिळविण्याचे प्रभावी साधन असले, तरी त्याचा अतिवापर विद्यार्थ्यांसाठी घातक ठरू शकतो. सोशल मीडियावर अनावश्यक वेळ न घालवता विद्यार्थ्यांनी मोबाईलचा वापर प्रामुख्याने अभ्यास आणि आवश्यक माहिती मिळविण्यासाठी करावा. तसेच इंटरनेट वापरताना वैयक्तिक व गोपनीय माहिती सुरक्षित ठेवण्याची विशेष काळजी घ्यावी असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रेय लेंडवे यांनी यावेळी केले.

र्यक्रमास पोलीस उपनिरीक्षक पंकज गाडेकर, माजी नगरसेवक अभिमन्यू साबळे, आनंता साबळे, पांडूरंग वरपे, गणेश परेदशी, रवी साबळे, अतुल जाधव, पैगंबर मणेरी, बापू देवकर, संदीप साबळे, ड.पुजारी, गणेश कोळी यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.